International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 12 No.4 Mar-Apr 2025

# विदर्भातील नाथजोगी—एक अष्टपैलू कलावंत

**डॉ. अर्चना सं. देशपांडे[1], चिराग रामभाऊ बोरवार[2]**
[1]मार्गदर्शक, संगीत विभाग प्रमुख, लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ
[2]संशोधक, एम. ए. संगीत, नेट
**Corresponding Author: डॉ. अर्चना सं. देशपांडे**
**Email:** cborwar21@gmail.com
**DOI-10.5281/zenodo.15172354**

**सारांश :**
नाथजोगी समाजात अनेक लोकपरंपरा दडलेल्या आहेत. समाजातील पारंपरिक जीवनशैलीचा ऱ्हास होत असतांना नाथजोगी समाजाने भारुडांच्या माध्यमातून परंपरा जतन करुन ठेवली आहे. नविन बदल व युगसापेक्षता यांचा अभ्यास करुन किंगरी, दिमडी, संबळ, हातपेटी या वाद्यांची निर्मिती करुन, त्यांना लोकसंगीतात योग्य तो दर्जा देऊन यथोचित सन्मान प्राप्त करुन दिला व ही कला टिकवून लोककलेचे संवर्धन केले. म्हणून नाथजोगी हे अष्टपैलू कलावंत आहेत, त्यांच्या कार्याची दखल घेणे क्रमप्राप्त ठरते.

**बीजशब्द :** लोकसंगीत, नाथजोगी, भारुड, परंपरा, कलावंत

**संशोधनाचे उद्दिष्ट :**
ग्रामिण भागातील नाथजोगी समुदायातील कलेचा व कलाकारांच्या समृध्द परंपरेचा अभ्यास करणे.

**प्रस्तावना :**
मानवी जीवनात रंजनाबरोबरच जीवनसत्याचा शोध घेत असतांना कल्पना, भावना आणि प्रतिमा यातूनच कला व कलाकार फुलत असतो हे लक्षात येते. जीवनात घडणाऱ्या सहज प्रवृत्तीला किंवा प्रचलित कथानकाला परिणामकारक लोकप्रकाराची साथ मिळाली की, त्यातून नवनिर्मिती सृजन पावते व अष्टपैलू कलावंतांचा उदय होतो. कोणतीही कला सादर करतांना आपले अंगिभूत कौशल्य आणि मनोभावनांच्या अविष्कारांना अंत:करणातून त्या सादरीकरणात ओतले तर ती गोष्ट बघणाऱ्याला आहे तशी न दिसता ती अधिक उत्कट वाटते व हेच अतिउच्च आणि अष्टपैलू कलावंताचे लक्षण होय. अशाच लोकप्रकाराचे बिज विदर्भातील नाथजोगी समाजात सुध्दा रुजलेले आहे व त्याला वाद्यांची आणि कल्पक प्रतिभेची जोड मिळून भारुडाचा उगम झाला आहे. माणसाला आनंद मिळण्याचे उच्च ठिकाण म्हणजे कला होय. फायदा—तोटा, नफा—नुकसान याचा चुकूनही विचार नसलेली, परंतु आनंद देणारी कला म्हणजे भारुडाचे गायन—वादन होय. असाच अतिउच्च कोटीचा अविष्कार सादर करत पुढे प्रदिर्घ काळ रसिकांच्या ह्दय सिंहासनावर विराजमान झालेला अष्टपैलू कलावंत म्हणजे नाथजोगी होय. ग्रामिण भागातील हे खरेखुरे हाडाचे कलावंत होय.

काळाच्या अनेक टप्प्यांवर ह्याच कलाकारांनी मनोरंजनातून लोकप्रबोधन केले. ज्वलंत सामाजिक प्रश्नांवर भाष्य केले. लोककलेचे जतन केले. गावात लोक जमवून आपली कला सादर करण्याचा तसेच प्रचार—प्रसार करण्याचा हातखंडा या नाथजोगी समुदायाने अंगिकारला. आपले हक्क आणि कर्तव्य याचा पुरेपूर उपयोग समाजाने उत्तम पध्दतीने करुन घेतला, त्यामुळे समाजात त्यांना मानसन्मानाबरोबरच पोटाची खळगी भरण्यासाठी भिक्षाही मिळाली. सामाजिक भान असल्यामुळेच या ग्रामिण कलाकारांचे पाय जमिनीवर असल्याचे आजही दिसते. अशा कलावंतांना प्राथमिक शिक्षणाच्या पुढे मजल मारता आली नसली, तरी प्रतिभाशक्तीच्या जोरावर अनेक नवनविन भारुडांचे विषय, ज्वलंत समस्या समाजापुढे हा समुदाय सातत्याने मांडत राहिला. मनोरंजनातून नितिमत्ता जागृत करण्याचे प्रामाणिक कार्य या समाजाने केल्याचे संशोधनातून लक्षात येते. ही कला मुळातच रक्तात भिनावी लागते. याकरिता प्रचंड आवड असावी लागते, यातूनच भारुड गायन—वादन कलेचा विकास होत गेला. स्वत:चे चरित्र सुध्दा जपायचे आणि सन्मार्गाची कास धरायची अशाप्रकारे महाराष्ट्राची वैभवशाली परंपरा असलेल्या भारुड या उज्वल लोकसंस्कृतीला शिखरावर नेण्याचे कार्य नाथजोग्यांनी केले व या लोककलेचे त्यांनी संवर्धन केले. यातूनच भारुड गायनाचा विकास होत गेला व या गानशैलीचा लौकिक झाला. या जातीतील प्रत्येक कलावंताला आपला स्वत:चा कलाविष्कार सादर करण्याचा जन्मजात अधिकार प्राप्त झालेला आहे. हा कलावंत आपल्या कलेतून इतका विकसित झालेला आहे की, पुढे या लोककलावंतांचे अस्तित्व कायमस्वरुपी सिध्द झाले असे दिसते. महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचे अशाच अष्टपैलू कलावंतांमुळे जतन झाले. समाजातील ग्रामिण व्यवस्थेत हे सर्व

कलाकार आजही पाहायला मिळतात. या कलावंतांचा शोध घेतांना भारुडे गाणाऱ्या नाथजोग्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. महाराष्ट्रातील लोकप्रकारात भारुड हा प्रकार लोकप्रिय मानला जातो. सर्वसामान्य माणसाच्या मनोरंजनाचा एक महत्वाचा भागच हे कलाकार झालेले दिसतात. मुक्तपणे कला सादर करण्याचे स्वातंत्र्य या नाथजोग्यांना परंपरेने मिळालेले आहे, म्हणून समाजातील वास्तव परिस्थितीवर मुक्तपणे आपले मत भारुडातून मांडण्याचा नाथजोग्यांना अधिकार आहे. याच नाथजोग्यांनी आपल्या कलेवर नित्यंत प्रेम करुन लोकांच्या मनोरंजनातून स्वत:चा आनंद वृध्दिंगत केला तसेच भारुडाला योग्य सन्मान देवून लोकवाद्यांची पुनर्भरणी केली. किंगरी, हलगी, संबळ, दिमडी, हातपेटी अशा लोकवाद्यांना त्यांनी प्रचलित केले व लोकवाद्याच्या मुख्य प्रवाहात आणले. यावरुन त्यांच्या प्रदिर्घ कला सेवा, कला योगदान, कला सृष्टीतील ज्येष्ठत्वाची प्रचिती येते. त्यांच्या या अथक परिश्रमातूनच हे साध्य झाले, म्हणून ते अष्टपैलू कलावंत आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**भारुड सादर करतांना :**

विदर्भामध्ये गारुड्यांनी दाखविलेल्या खेळांना 'गारुड' म्हणतात, तर नाथजोगी—भराड्यांनी गायलेल्या गाण्यांना 'भारुड' या नावाने ओळखतात. या नावाची उत्पत्ती भराडी (नाथजोगी) या नावाशी संबंधित ठरते.

भजनी भारुडांचे सादरीकरण करतांना हे नाथपंथाचे अनुयायी कानात कुंडले, संन्याशाप्रमाणे शिखासुत्र, भगवे वस्त्र, भगवा फेटा, कपाळावर विभूती, कानात मुद्रा, काखेत झोळी, मेखला, शिंगी, कमरेला बांधलेला लोंबता घंटा, हातात किंगरी/हातपेटी, अशा वेशभुषेच्या स्वरुपात सादरीकरण करतात. तर सोंगी भारुडांमध्ये कलाकार विषयाशी संबंधित वेशभुषा करुन किंवा नेहमीच्या साध्या वेशभुषेत कला सादर करतात. भारुडांना विषयाचे बंधन नसते. बऱ्याच कुटकथा, आख्यान आणि सामाजिक विषय हा भारुडांचा विषय असतो. योग सामर्थ्याने घडणारे चमत्कार, बुवाबाजी, समाजातील अंधभक्तांची फसवणूक असे भारुडांचे सर्वसंग्राहक स्वरुप असते. पुष्कळदा काहीतरी असंबध्द आणि निरर्थक ऐकण्यात येत असल्याचे सुध्दा जाणवते. कित्येक लावणी रचनाकार, शाहिर, तुरेवाले हे नाथपंथांचे अनुयायी होते. म्हणून काही सामाजिक रचनांमागे आध्यात्माचा संदर्भ दिसतो. भजनी भारुड हे त्याचेच उदाहरण होय. मात्र भारुडे गातांना ते ऐकणाऱ्याला निरर्थक वाटणार नाही याची काळजी ते कलाकार घेतात. कोणत्याही ज्वलंत विषयाला गाण्यातून योग्य न्याय देवून भारुडाला परिपूर्ण करतात. सादरीकरणाचा त्यांचा अभ्यास वाखाणण्याजोगा आहे. समाजातील जिज्ञासू, मुमुक्षू, साधक असतील अशा लोकांनी समाजाचा कल आणि गरज पाहून भारुडांची रचना केली. भारुड हे देखील सामाजिक आव्हानातून निर्माण झाले, त्यामुळे त्या तत्कालीन परिस्थितीत समाजाला आकृष्ठ करणाऱ्या संगीतास स्थान मिळणे अपरिहार्य ठरले.

**निष्कर्ष :**

भारुड गाणाऱ्या या कलाकारांमध्ये नवनिर्मितीची कल्पकता, संक्षेप विस्ताराचे धोरण, नविन बदल, युगसापेक्षता, कालोचित संदेश, आत्मभान, इत्यादी गोष्टींबरोबर मुळ कृतीसोबत साधलेले वेगवेगळे परिणाम हे सर्व गुण नाथजोगी कलावंतात दिसतात. म्हणून हे विदर्भाच्या ग्रामिण भागातील 'अष्टपैलू कलावंत' आहेत हे संशोधनाअंती सिध्द होते.

**संदर्भ ग्रंथ :**


1. चव्हाण रामनाथ (२००६), 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत, भाग—१', देशमुख पब्लिशर्स, पूणे, ४१४०३०.
2. चव्हाण रामनाथ (२०१६), 'भटक्या विमुक्तांची जातपंचायत, भाग—२', देशमुख पब्लिशर्स, पूणे, ४१४०३०.
3. ढेरे डॉ. रा. ची. (१९६४), 'संतसाहित्य आणि लोकसंगीत', अनुबंध प्रकाशन, पूणे.
4. मांडे प्रभाकर (२०१८), 'लोकरंगभूमी', गोदावरी प्रकाशन, साधना हाऊसिंग, अहमदनगर, ४१४००३
5. मांडे प्रभाकर (२०१८), 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', गोदावरी प्रकाशन, साधना हाऊसिंग, अहमदनगर, ४१४००३.
6. मालभे सं. ग. (१९८२), 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', सुलभ मुद्रणालय, पुणे.
7. जोशी प्र. न. (१९७८), 'मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास', प्रसाद प्रकाशन, पुणे.